ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख १४ डिसेंबर, १९५५ | अंक ४६

## विविध माहिती

**ह्यूएनत्संगवर चित्रपट**—सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएनत्संग हा ७ व्या शतकांत भारतांत प्रवास करून परत गेला होता. ह्या जगप्रसिद्ध प्रवाशाच्या जीवनावर चित्रपट काढण्याचें घाटत आहे. भारतीय चित्रपट प्रतिनिधींचें जें मंडळ चीनला गेलें आहे, त्यामधील श्री. चेतन आनंद ह्यांनीं ह्यासंबंधीं चीनच्या सरकारशीं करारहि केला आहे. चित्रपटनिर्मितीच्या कामीं रशिआहि सहकार्य करणार आहे.

**मद्रासमधील प्राणिसंग्रहालय**—मद्रासमधील प्राणिसंग्रहालयाचा १०० वा वाढदिवस साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं झालेल्या भाषणांत, अशा संस्थांच्या शैक्षणिक महत्त्वाकडे लक्ष वेधण्यांत आलें. मद्रासच्या कॉर्पोरेशननें हें प्राणिसंग्रहालय चालविलें आहे. मद्रासचे मेयर श्री. चिदंबरम् ह्यांनीं सरकारकडे अधिक द्रव्यसाहाय्याची मागणी केली व अशीं संग्रहालयें जिल्हावार काढण्यांत यावींत असें सुचविलें.

**आंध्र राज्यांत आयुर्वेदाच्या शाळा**—आंध्र राज्यांत आयुर्वेदिक औषधपद्धतीचें शिक्षण देणारीं कॉलेजें व शाळा काढण्यासाठी एक खास कमिटी नेमण्यांत आली आहे. आयुर्वेदाच्या प्रचारांत मद्रासचे डॉ. लक्ष्मीपति ह्यांनीं पुढाकार घेतला आहे. ह्या विषयावर भाषण करतांना डॉ. लक्ष्मीपति म्हणाले कीं, आयुर्वेदाला ॲलोपथींतील सर्व गोष्टी घेतां येतील. उलटपक्षीं ॲलोपथीला मात्र आयुर्वेदाचीं सर्व तत्त्वें आत्मसात् करतां येणार नाहींत.

**भारताचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—भारतीय मंत्रिमंडळाचे आंकडेशास्त्रज्ञ सल्लागार प्रा. महालनबिस हे जिनीव्हा व लंडन येथें भरलेल्या तांत्रिक कमिट्यांच्या बैठकीस हजर राहून परत आले. त्यांनीं आपल्या लंडनमधील मुक्कामांत ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांशीं व शास्त्रज्ञांशीं भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाविषयीं चर्चा केली. भारतांत नियोजित अर्थव्यवस्था उभारण्याचा जो प्रयत्न होत आहे त्याबद्दल परदेशांतील राजकीय पुढारी, अर्थशास्त्रज्ञ व शास्त्रज्ञ ह्यांच्यांत बरेंच औत्सुक्य दिसून आलें, अशी माहिती त्यांनीं सांगितली.

**संगीताच्या वाद्यांचें उत्पादन**—अखिल भारतीय हस्तव्यवसाय बोर्ड, मद्रास येथें भारतीय संगीतासाठी लागणारीं वाद्यें तयार करण्याचें शिक्षण देणारी संस्था स्थापन करणार आहे. भारतीय सरकारनें संस्था उभारण्यासाठी ५२,२०० रुपये मंजूर केले आहेत. संगीताला लागणारीं वाद्यें शास्त्रीय रीत्या तयार करण्यांत येऊन ठराविक दर्जाचीं वाद्यें लोकांना मिळावीं, म्हणून हा उपक्रम करण्यांत आला आहे.

**फिलिपाइन्ससाठी भारतीय गाई**—भारतांतील गुरांची पैदास करणाऱ्या केंद्रांमधून ६०० उत्तम प्रतीच्या गाई फिलिपाइन्सला निर्यात करण्यांत येणार आहेत. ह्या गायींची निवड फिलिपाइन्सच्या तज्ज्ञानें केली आहे. भारतामधून गुरें निर्यात करण्यास परवानगी दिली जात नाहीं. पण खास परवानगी काढून ह्या गाई निर्यात करण्यांत येत आहेत. फिलिपाइन्समधील गुरांची अवलाद सुधारण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे. फिलिपाइन्समध्यें दुभत्या गायींचा तुटवडा आहे.

**कृष्णा-गोदावरीचें पाणी**—मद्रासचे अर्थमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् हे तिरुचिरापल्ली येथें भाषण करतांना म्हणाले कीं, कृष्णा व गोदावरी ह्या नद्यांचें ९० टक्के पाणी समुद्रांत विलीन होतें. ह्या नद्यांना ठिकठिकाणीं आडवण्यांत आलें तर उत्तर व दक्षिण सरकार आणि चिंगलपुट ह्या जिल्ह्यांमधील जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल. मात्र, ह्या कामीं आंध्र सरकारच्या सहकार्याची जरूर आहे.

**मुंबई बंदरांत नवीन याऱ्या**—मुंबई बंदरांतील अलेक्झांड्रा व बॅलर्ड पिअर ह्या गोद्यांतून दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा होण्यापूर्वी विजेच्या ८७ नवीन याऱ्या बसविण्यांत येणार आहेत. ह्यांपैकी ३४ याऱ्या बसविण्याचें कंत्राट कलकत्त्यामधील एका कंपनीला देण्यांत आलें आहे. ३४ याऱ्या बसविण्यास ८०·६३ लाख रुपये खर्च येणार आहे. मुंबई बंदरांत येणाऱ्या उतारूंच्या व मालवाहतुकीच्या आधुनिक बोटी मोठ्या असल्यामुळें नवीन याऱ्यांची आवश्यकता भासत आहे.

**मेडिकल कॉलेजची मागणी**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत देशांत स्थापन करण्यांत येणाऱ्या सहा नव्या मेडिकल कॉलेजपैकी एक त्रावणकोर-कोचीन राज्यांत असावें, अशी मागणी करण्यांत आली आहे. राज्याची लोकसंख्या १·४ कोटी असून त्यांत एकच मेडिकल कॉलेज आहे. ह्या मेडिकल कॉलेजसाठीं १२८ विद्यार्थ्यांची सोय करणारें वसतिगृह नुकतेंच बांधण्यांत आलें.

**डिझेल तेलावर चालणाऱ्या मोटारगाड्या**—जमशेटपूर येथील टाटांच्या कारखान्यांत मर्सिडिस-बेंझ ह्या जर्मन बनावटीच्या मालमोटारी तयार करण्यांत येतात. त्यांचें वार्षिक उत्पादन आतां २,००० वरून ३,००० करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें डॅमलर बेंझ बनावटीच्या १८० गाड्या दरवर्षी तयार करण्यांत येणार आहेत. ह्या गाड्यांना फार कमी खर्च पुरतो. मुंबई ते दिल्ली हा ९०० मैलांचा प्रवास करण्यास ह्या गाडीला अवघे ३४ रुपये लागतात.

**इजिप्तमधील नवें धरण**—नाइल नदीवर आस्वान ह्या ठिकाणीं बांधण्यांत यावयाच्या मोठ्या धरणासंबंधीं सल्लामसलत देण्यासाठी इजिप्तच्या सरकारनें एका ब्रिटिश कंपनीशीं करार केला आहे. इजिप्तकडून तांदूळ व कापूस घेऊन त्यांच्या बदली वीजनिर्मितीची यांत्रिक सामग्री देण्याची रशिआनें तयारी दाखविली आहे. हंगेरी व पूर्व जर्मनी एंजिनिअर्स पुरविण्यास तयार आहेत. इजिप्तनें जागतिक बँकेसहि भांडवल पुरविण्यासाठी विनंति केली आहे. हें भांडवल ब्रिटिश, फ्रेंच व पश्चिम जर्मनीच्या बँकांनीं पुरविल्यास तें घेण्याची इजिप्तची तयारी आहे. नवें धरण जगांतील एक प्रचंड धरण होईल. तें बांधण्यास १० वर्षे लागतील. धरणाच्या पाण्याखालीं ३० लाख एकर जमीन भिजेल आणि त्यावर अमेरिकेच्या 1/2 इतकी वीज निर्माण होईल.

**भगवान् बुद्धाची २,५०० वी जयंती**—पुढील वर्षी गौतम बुद्धाची २,५०० वी जयंती भारतांत साजरी करण्यांत येणार आहे. त्या निमित्तानें भारतीय सरकार जगाच्या निरनिराळ्या देशांतून २०० पंडितांना आमंत्रण करणार आहे. जयंतीनिमित करण्यांत येणाऱ्या खर्चासाठी सरकार सुमारें १ कोटी रुपये खर्च करणार आहे. बुद्धविषयक जुन्या ऐतिहासिक अवशेषांची अधिक चांगली निगा राखणें, अशा ऐतिहासिक स्थानांना जाणारे रस्ते सुधारणें, पिण्याच्या पाण्याची सोय करणें, पांथस्थांना उतरण्यासाठी आश्रयालयें बांधणें, वैद्यकीय मदतीची व्यवस्था करणें, विजेचीं केंद्रें उभी करणें, इत्यादि कामांसाठी वरील रक्कम खर्च करण्यांत येणार आहे.

**इथिओपिआंतील इस्पितळ**— इथिओपिआच्या राजेसाहेबांच्या कारकीर्दीचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं आदिस अबाबा ह्या राजधानींत बांधण्यांत आलेलें गांधी-स्मृति इस्पितळ त्यांना अर्पण करण्यांत आलें. इथिओपिआंतील भारतीय व इथिओपिअन नागरिकांच्या स्त्रियांसाठीं तें वापरण्यांत येणार आहे.

**आनंदच्या पाणीपुरवठ्याची सोय**—आनंद म्युनिसिपालिटीला पाणीपुरवठा करण्याची एक योजना मुंबई सरकारनें मंजूर केली आहे. योजना पूर्ण करण्यासाठी ९ लाख रुपयांचा खर्च येणार आहे. त्यापैकीं ४॥ लाख रुपये सरकार मदत म्हणून देणार असून ३·२५ लाख रुपये कर्ज म्हणून देणार आहे. उरलेली रक्कम म्युनिसिपालिटी जमविणार आहे.

**चित्तरंजन रेल्वे-एंजिनांचा कारखाना**—चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनाच्या कारखान्यांतून ३०० वें रेल्वे एंजिन नुकतेंच बाहेर पडलें. गेल्या फेब्रुआरींत कारखान्यांत तयार झालेल्या २०० व्या एंजिनाप्रीत्यर्थ राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद तेथें गेले होते. कारखाना उभारला त्यावेळीं दरवर्षी १२० रेल्वे एंजिनें तयार होतील, असा अंदाज करण्यांत आला होता.

**कापड कामगारांना बोनस**— अहमदाबाद येथील आणखी आठ कापड गिरण्यांनीं आपल्या कामगारांना १९५४ चा बोनस म्हणून १५ दिवसांचें वेतन देण्याचें ठरविलें आहे. आतांपर्यंत ११ गिरण्यांनीं १९५४ सालचे बोनस देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. १९५३ सालचा बोनस म्हणून ६३ गिरण्यांनीं ६५,००,००० रुपये गेल्या महिन्यांत वाटले.

**अणुशास्त्राची शाळा**— अमेरिकेंत अणुशास्त्र व एंजिनिअरिंग हा विषय शिकविण्यासाठीं काढण्यांत आलेल्या नव्या शाळेंत ६६ अमेरिकन विद्यार्थ्यांना व २१ परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला आहे.


दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. व. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




# अर्थ

बुधवार, ता. १४ डिसेंबर, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दिल्लीमधील प्रदर्शन—संक्रमणाचें चिन्ह ?

दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या प्रचंड औद्योगिक प्रदर्शनानें जागतिक लक्ष वेधलें आहे. प्रदर्शनाची संधि साधून रशिआ, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रुमानिया, इत्यादि कम्युनिस्ट छापाच्या देशांनीं, आपल्या मालाची उत्कृष्ट जाहिरात केली आहे. प्रदर्शनांतील रशिअन स्टॉल तर खूपच यशस्वी झाला आहे. प्रॉस्पेक्टिंग व ड्रिलिंग रिग्ज, छपाईची मशिनरी, मशीन टूल्स, इलेक्ट्रो-मॅग्नेटिक साहित्य, ट्रॅक्टर्स, ट्रॉलर्स, इत्यादि मालानें रशिअन स्टॉल भरला आहे. एका खाजगी फर्मनें बऱ्याच किंमतीची छपाईची यंत्रसामुग्री घेण्याचा करार केला आहे. एका प्रचंड पोलादाच्या कारखान्याच्या उभारणीचें कंत्राट रशियाला मिळालेंच आहे. खनिज तेलांचा शोध, हिरे व कोळसा ह्यांच्या खाणी, इत्यादि बाबतींत रशियन तज्ज्ञ मदत करणार आहेत. झेकोस्लोव्हाकियानें प्रदर्शनासाठी जो माल आणला होता, तो सर्वच विकला गेला आहे. पोलादाच्या कारखान्याबाबत झेक सरकारच्या भारत सरकारशीं वाटाघाटी चालू आहेत. हंगेरीनें सढळ हातानें भारताला उधारीवर माल पुरविण्याची तयारी दर्शविली आहे व हिंदी तरुणांना हंगेरींत यांत्रिक शिक्षण देण्यास तो देश विशेष उत्सुक आहे. तेलाचा शोध व त्यासाठीं यंत्रसामुग्री, ह्याविषयीं रुमेनियाहि मदत देऊं करीत आहे. पश्चिम जर्मनी व नेदरलंडस् ह्या देशांनींहि भारतांत बरीच यंत्रसामुग्री विकली आहे.

रशियन नेत्यांचें भारतांतील प्रचंड स्वागत, त्यांचीं विविध भाषणें आणि त्याच वेळेस भरलेलें हें प्रदर्शन, ह्यामुळें ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्या देशांत खळबळ उडाली आहे. हिंदी बाजारपेठेंत कम्युनिस्ट देशांचा होत असलेला प्रवेश त्यांना पसंत नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेस पाश्चात्य देशांकडून अपेक्षित मदत न मिळण्याचा संभव आहे, असें पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें आहे. लंडन टाइम्सनें ह्या प्रदर्शनाविषयीं व्यक्त केलेले उद्गार उद्बोधक आहेत. तें पत्र म्हणतें, बहुतेक "पौर्वात्य युरोपीय देश, युगोस्लाव्हिया व पूर्व जर्मनी ह्यांनीं प्रदर्शनांत भाग घेतला आहे, इतकेंच नव्हें तर तो उठावदार व आकर्षक झाला आहे. त्यांच्या गाळ्यांत विविध प्रकारचा भांडवली व गिऱ्हाइकी माल भरला आहे. भारत सरकाचे अधिकारी, पार्लमेंटचे सभासद, वृत्तपत्रें आणि सामान्य जनता ह्यांवर त्यानें पकड बसविली आहे. प्रचाराचा व विक्रीचा पहिला टप्पा, ह्या दृष्टीनें त्या देशांनीं अपूर्व यश मिळविलें आहे. त्यांचे व्यापारी प्रतिनिधी, मंत्री, व्यापारी चेंबर्सचे अध्यक्ष, इत्यादींची उपस्थिति स्पष्ट करते, कीं प्रदर्शन हा त्यांच्या औद्योगिक व व्यापारी आक्रमणाचा पहिला टप्पा आहे. वृत्तपत्रकारांच्या बैठकी बोलावणें, प्रमुख हिंदी लोकांना व संपादकांना खाद्य-पेय देणें, इत्यादि मार्गांचा अवलंब करून त्यांनीं अमेरिकन विक्रीपद्धत अंमलांत आणली आहे."

प्रस्तुत प्रदर्शन व रशियन नेत्यांचा दौरा, ह्या एकाच वेळीं झालेल्या घटनांचा भारताच्या भवितव्यावर अतिशय प्रभावी परिणाम होणार, हें निश्चित दिसत आहे. रशियन नेत्यांच्या समवेत आलेले अधिकारी व तज्ज्ञ हे भारताच्या गरजांची व परिस्थितीची सूक्ष्म पहाणी करीत आहेत व आपल्या वागणुकीनें सामान्य लोकांचीं मनें जिंकीत आहेत. ब्रिटिश व अमेरिकन मदत आजवर कितीहि मोठी व मोलाची झाली, तरी तिचा ओघ आतां मंद होऊं लागला आहे आणि भारताची गरज तर वाढत चालली आहे, त्याचा फायदा रशिया प्रभृति देश घेत आहेत. सौदा फायदेशीर होण्याच्या दृष्टीनें, भारताची आजची भूमिका अत्यंत अनुकूल आहे. तात्कालिक फायदा व दीर्घकालीन हित ह्यांचा मेळ कसा बसेल, हा प्रश्न अर्थातच महत्त्वाचा आहे.

---

## विजेच्या भारी यंत्रसामुग्रीचें उत्पादन

भारतीय सरकारनें विजेची भारी यंत्रसामुग्री निर्माण करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें असून त्याकामीं ब्रिटिश तंत्रज्ञांची मदत घेण्याचें ठरविलें आहे. हा कारखाना कोठें काढावा व त्यासंबंधींची इतर व्यवस्था कशी करावी, ह्याविषयीं सल्ला देण्यासाठीं ब्रिटिश तंत्रज्ञांचें व विशेषज्ञांचें एक मंडळ दिल्ली येथें आलें आहे. ब्रिटिश प्रतिनिधिमंडळाचे पुढारी म्हणून सुप्रसिद्ध मेट्रो-व्हिकर्स कंपनीचे असिस्टंट मॅनेजर मि. पॅटर्सन हे आले आहेत. भारताच्या उत्पादन-खात्याचे सेक्रेटरी आणि ब्रिटिश प्रतिनिधी ह्यांच्यांत संकल्पित कारखान्यासंबंधीं वाटाघाटी सुरू झाल्या आहेत. कारखाना काढण्याच्या कामीं ब्रिटनमधील असोशिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज ह्या संस्थेचें सहकार्य भारत सरकारला मिळणार आहे. मध्यवर्ती सरकार आणि साहाय्यक ब्रिटिश संस्था ह्यांच्या दरम्यान १५ वर्षांचा करार करण्यांत येणार आहे. आताच्या अंदाजाप्रमाणें कारखान्यासाठीं २५ कोटी रुपये भांडवल लागेल. भारतीय सरकार कारखाना काढण्याच्या कामीं राज्य-सरकारांचें म्हणणें ऐकून घेणार आहे. एखाद्या राज्य-सरकारला हा कारखाना आपल्या राज्यांत निघावा असें वाटत असेल तर त्यानें आपली बाजू सरकारपुढें मांडावयाची आहे. कारखान्याची जागा निश्चित करण्यासाठीं ब्रिटिश तज्ज्ञांना ४ महिन्यांचा अवधि देण्यांत आला आहे. त्या अवधींत त्यांनीं आपलें मत सरकारला सादर करावें अशी विनंती करण्यांत आली आहे. कारखान्यासंबंधीं संपूर्ण अहवाल तज्ज्ञांकडून १९५६ च्या डिसेंबर पर्यंत येईल असा अंदाज आहे. भारतांत भारी वजनाची यंत्रसामुग्री तयार करण्यासाठीं उमेदवारांना जरूर तें शिक्षण देण्याचेंहि घाटत आहे. मेट्रो-व्हिकर्स कंपनीचा एक प्रतिनिधि ह्या बाबतींत चौकशी करीत आहे.

---

**भारतांतील दारुबंदीचा अभ्यास**— भारतामधील दारुबंदीचा अभ्यास करण्यासाठीं सीलोनच्या सरकारचें पांच जणांचें एक कमिशन ता. २० नोव्हेंबरपासून भारतांत दौरा करीत आहे. आपल्या प्रवासांत कमिशन मुंबई, मद्रास, आंध्र व त्रावणकोर-कोचीन ह्या राज्यांना भेटी देत आहे.

## लवाद-दाव्याच्या निर्णयाची कालमर्यादा

( स. वा. कुलकर्णी )

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या १९२५ च्या कायद्यान्वयें कलम ५४ यांत नमूद केलेप्रमाणें एकादा वाद अगर तंटा निर्माण झाल्यास त्या वादाचा निर्णय करणेसाठी मे. रजिस्ट्रार कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांनीं नेमलेल्या नॉमिनीकडे कागदपत्र पाठवले जातात. अशा स्वरूपाच्या लवाद-दाव्याचा निकाल करतांना नॉमिनीस ज्या पद्धतीनें कामकाज करावें लागतें. त्याबाबतचा तपशील सदरचे कायद्याखालील केलेल्या कानू ३२ ते ३५ यांत नमूद केलेला आहे. कानू ३२ च्या शेवटच्या भागांत नमूद केलेप्रमाणें अशा दाव्यांचा निकाल सदरचे कागदपत्र नॉमिनीकडे पोंचले तारखेपासून दोन महिन्यांचे आंत करावयाचा असतो. कांहीं अपरिहार्य कारणांमुळें सदरचे मुदतींत दाव्याचा निकाल न झाल्यास, ही कालमर्यादा वाढवून मिळणेची तरतूद केलेली आहे व अशी मुदतवाढ करून देणेचा अधिकार सहकारी खात्याचे रजिस्ट्रार यांस दिलेला आहे. अशा प्रकारची कालमर्यादा घालून देणेचा प्रधान उद्देश हा कीं, लवाद-दाव्यांचा निर्णय झटपट व्हावा व संबंधी पक्षकारांना त्वरित न्यायदान मिळावें. परंतु सहकारी सोसायट्यांच्या कायद्याखालील उपस्थित होणाऱ्या लवाद दाव्यांचा निकाल करतांना ज्या तंत्राचा अवलंब सदरचे कानून्वयें नॉमिनीस अगर लवाद-बोर्डास करावा लागतो, ती पद्धत कालहरण करणारी असलेमुळें सदरची दोन महिन्यांची कालमर्यादा अपुरी असून त्यामुळें मुदतवाढ करून मिळणेसाठी निष्कारण पत्रव्यवहार करावा लागतो. नॉमिनीकडे लवाद दाव्याचे कागदपत्र आलेवर संबंधी पक्षकारांना प्रथम कानू ३२ अन्वयें नोटिसा काढाव्या लागतात. ह्या नोटिसा बव्हंशीं रजिस्टर्ड पोस्टानें पाठविल्या जातात व त्यानंतर पंधरा दिवसांचा अवधि संबंधी पक्षकारांना लवाद बोर्डापुढें दावा चालावा असें कळवणेसाठी दिलेला असतो. बऱ्याच वेळां असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, बरेच पक्षकार हे दूर खेडेगांवीं राहात असतात व पोस्टामार्फत अशा नोटिसा बजावून येईपर्यंत बराचसा काळ निघून गेलेला असतो. त्यानंतर कोणी पक्षकारानें प्रतिनिधी देणेची इच्छा आहे असें कळवून लवादबोर्डाची मागणी केल्यास अशा प्रतिनिधींचें नांव, पत्ता व संमतिदर्शक पत्र घेणेसाठी पुन: पत्रव्यवहार करावा लागतो; अशा तऱ्हेनें लवादबोर्ड तयार होऊन लवाद दाव्याच्या रीतसर कामकाजास सुरुवात करावयाच्या वेळेपर्यंत सदरचा दोन महिन्यांचा कालावधि संपून जातो. तदनंतर दाव्याचीं समन्सें संबंधी पक्षकारांना पाठवून तीं बजावल्यावर पुढील सर्व कामकाज दिवाणी कोर्टात चालणाऱ्या कज्जासारखें चालतें. लवाद दाव्याचें काम चालू असतांना लवाद बोर्डावरील सर्व सदस्य ज्यावेळीं हजर असतील त्यावेळींच रीतसर कामकाज चालतें. एकादा सदस्य कांहीं कारणामुळें गैरहजर राहिल्यास इतर सदस्यांना लवाद-दाव्याचें कांहींहि काम करतां येत नाहीं व त्यावेळीं सर्व काम स्थगित ठेवावें लागतें; व ह्या पद्धतीनें कालहरण होऊन संबंधी पक्षकारांचा व लवाद बोर्डातील सदस्यांचा वेळ व श्रम वृथा वाया जातात. लवाद दाव्यांत बहुतेक वेळां कांहीं कायदेशीर गुंतागुंतीचे मूलभूत प्रश्न उपस्थित होतात व दाव्याची चौकशी त्वरित सुरू करूनहि दाव्यांचा निर्णय लवकर लागत नाहीं. अशा वेळीं नॉमिनीस सहकारी खात्याकडे पत्रव्यवहार करून वरचेवर मुदत वाढवून घ्यावी लागते. कांहीं थोडे किरकोळ स्वरूपाचे लवाद-दावे वगळल्यास, ज्या लवाद दाव्यांचे कामीं लवाद बोर्डाकडून दाव्याचा निकाल होतो अशा कामीं दोन महिन्यांत दाव्यांचा निकाल झालेला क्वचितच पाहावयास मिळतो. कानू ३२ अन्वयें सांगितलेल्या तंत्राचा अवलंब करून अशा स्वरूपाचे लवाद दावे दोन महिन्यांत निर्णयाप्रत पोंचत नाहींत व ही कामकाजाची पद्धत जोंपर्यंत पालटलेली नाहीं तोंपर्यंत दोन महिन्यांचा दाव्यांच्या निर्णयासाठीं दिलेला काल हा अपुरा आहे, असें निदर्शनास येतें. ज्या दाव्यांचा निकाल लवाद बोर्डाकडून होतो, त्या दाव्यांच्या बाबतींत ही कालमर्यादा वाढविणें इष्ट आहे.

---

### अमेरिकेंतील निवडणुका व शिलकी धनधान्य

अमेरिकेंत पुढील वर्षी अध्यक्षांची निवडणूक व्हावयाची आहे. ह्या निवडणुकींत धान्य व शेतीच्या मालाच्या किंमतींना बरेच महत्त्व येणार असा रंग दिसूं लागला आहे. तेथील रिपब्लिकन पक्षाचें म्हणणें असें आहे कीं, डेमोक्रॅटिक पक्षाच्या कारकीर्दीतच अमेरिकेंत धान्य व इतर कांहीं शेतीच्या पदार्थांचे शिलकी साठे फार वाढले. उलटपक्षीं, डेमोक्रॅटिक पक्षाच्या मतानें सध्याच्या रिपब्लिकन सरकारच्या शेतीमालाच्या किंमती विवक्षित पातळीखालीं जाऊं न देण्याच्या धोरणामुळें परिस्थिति अधिकच बिकट होऊं लागली आहे. ह्या दोन पक्षांच्या सिनेटर्सनीं ह्या बाबतींत टेलिव्हिजनवरील कार्यक्रमांत नुकताच वादविवाद केला. रिपब्लिकन पक्षाचे सिनेटर केपहार्ट म्हणाले कीं, अमेरिकेंतील सुमारें ७,००,००,००,००० डॉलर्स किंमतीचा शेतीचा माल शिल्लक पडून आहे. ह्या मालाची विल्हेवाट लावल्याशिवाय शेतीच्या मालाच्या किंमती व शेतीमालापासून होणारें उत्पन्न वधारणार नाहींत असें मत त्यांनीं व्यक्त केलें आणि किंमती व उत्पन्न वाढविण्यासाठीं ह्या शिलकी मालाचा नाश करण्यांत यावा, निदान कांहीं साठ्याचा नाश करण्यांत यावा अशी सूचना त्यांनीं केली. डेमोक्रॅट पक्षाचे सिनेटर जोसेफ मॅहानी ह्यांच्या मतानेंहि शेतीच्या मालाच्या किंमतींचा प्रश्न हा अमेरिकेंत आज फार महत्त्वाचा होऊन बसला आहे. ह्या मालाचा सांठा कमी झाला पाहिजे असेंच त्यांचेंहि मत आहे. पण सिनेटर केपहार्ट म्हणतात त्याप्रमाणें मालाचा नाश न करतां तो लोकांच्या मुखीं पडून संपवावा अगर कमी करावा असें त्यांचें म्हणणें आहे. प्रचलित अर्थव्यवस्थेंत उत्पादित मालाचा खप होण्याइतकी खरेदीची शक्ति त्यांच्यांत नसते असा आक्षेप घेण्यांत येतो. त्याला पुष्टि देणारी वरील परिस्थिति आहे.

---

**तांदुळाच्या निर्यातीची परवानगी**—चालू वर्षअखेर जास्तींत जास्त २ लाख टन तांदुळाची निर्यात करण्याची परवानगी भारतीय सरकार देईल, असें समजतें. देशांतील निरनिराळ्या भागांत नद्यांना आलेल्या पुरामुळें अन्नधान्याच्या निर्मितींत घट येण्याची शक्यता असल्यामुळें सप्टेंबर नंतर तांदुळाच्या निर्यातीला परवानगी मिळण्याचा फारसा संभव नव्हता. आतांपर्यंत भारतानें ६५०००, टन तांदूळ निर्यात केला आहे. ब्रिटन, सीलोन, एडन, बहरीन बेटें व मॉरिशस ह्या देशांना भारतीय तांदूळ पाठविण्यांत आला.

**अणुशक्तीचा शांततामय उपयोग**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत रशिआ आणखी एक दालन पुढील महिन्याच्या प्रारंभीं उघडणार आहे. ह्या दालनांत अणुशक्तीच्या शांततामय उपयोग करण्याच्या बाबतींत रशिआनें केलेली प्रगति दाखविण्यांत येणार आहे. वैद्यकीय बाबतींत त्याचप्रमाणें शेती, उद्योगधंदे व धातू ह्यांच्या बाबतींत अणुशक्तीचा उपयोग रशिआंत होऊं लागला आहे, असें म्हणतात.

## चहा !

अजूनपर्यंत देशांतील पैसे गुंतविणारांना चहाच्या मूल्याची कल्पना आलेली दिसत नाहीं. वास्तविक आपल्या निर्यात व्यापारांत चहाचें स्थान अग्रगण्य आहे. सुदैवानें चहाच्या उत्पादनास हिंदची भूमि नैसर्गिक दृष्ट्या अत्यंत अनुकूल आहे; आणि तसें हवा-पाणी दुसऱ्या कोठऱ्याहि देशाला चढाओढीनें निर्माण करणें शक्य नाहीं. जगभर चहाची चहा वाढतच चाललेली आहे. जपान चहाकरतां हिंदच्या बाजारांत आलेला आहे. तसेंच, हिंद सरकारच्या चहा निर्यात समितीच्या प्रयत्नानें न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया हिंदच्या चहा बाजारांत खरेदीकरतां येत आहेत.

हिंदचें चहाचें वार्षिक उत्पादन सुमारें ६० ते ६३ कोटी लक्ष रत्तलपर्यंत आहे. हिंदचें चहापान फक्त १७-१८ कोटी रत्तलांपर्यंत असून बाकीचा सर्व चहा युरोप, रशिआ, अमेरिका, मध्यपूर्व देश, यांत निर्यात होतो. चहामुळें जास्तींत जास्त परदेशी हुंडणावळ हिंदला उपलब्ध होत आहे व त्यामुळें हिंद सरकार चहाच्या निर्यातीस प्रमाणशीर निर्यात जकातीनें उत्तेजन देत आहे. निर्यात जकातीमुळें स्थानीय चहा पिणें कमी झालें तरी सरकारला चहा ही जीवनावश्यक वस्तु न वाटल्यामुळें, निर्यातीस उत्तेजन देणेंच जास्त महत्त्वाचें वाटतें.

चहाचें उत्पादन निसर्गावर अवलंबून असल्यामुळें इतर उद्योगांत स्थिर नफा मिळण्याची शक्यता जास्त असली, तरी दरवर्षी नफ्याचा विचार जर न केला आणि दोन-पांच वर्षें हा कालक्रम विचारांत घेतला तर निःसंशय चहाच्या शेअर्सना जास्तींत जास्त नफा गेल्या कित्येक वर्षांत सुटलेला आहे. चहाच्या बाबतींत वार्षिक टक्केवारीचा विचार तितकासा उपयोगी ठरत नाहीं, हा अनुभव आहे. तेव्हां पैसे गुंतविणारांनीं सालीं व्याजाचा हिशोब न करतां, दोन-पांच वर्षांवर काय सुटलें याचा विचार ठेवावा. या दृष्टीनें कलकत्त्याकडील ब्रुक ब्रॅांड, तेझपूर, बनारहाट, गोफर, इत्यादि शेअर्सकडे गुंतविणारांनीं लक्ष ठेवणें त्यांच्या फायद्याचेंच ठरेल, यांत संशय नाहीं.

— व. वि. लोणकर
१२८६ अ पुणें ५.

'जलविष्णु' पोहूं लागलें—हिंदुस्थान शिपयार्डसमध्यें बांधण्यांत आलेलें 'जलविष्णु' जहाज नुकतेंच समुद्रांत सोडण्यांत आलें. जहाज डिझेल एंजिनावर चालणारें असून मालाची वहातूक करणारें आहे. कारखान्यांत बांधण्यांत आलेली ही १५ वी बोट असून तिचें वजन ७,००० टन आहे. जलवितरण समारंभ कारखान्यांतील एका कामगाराच्या हस्तें करण्यांत आला.

**माकडांची निर्यात बंद करा**—ब्रिटनमधील जीवदया संघानें भारतामधून प्रयोगासाठी करण्यांत येणारी माकडांची निर्यात बंद करावी, अशी मागणी केली आहे. संघाच्या प्रतिनिधि मंडळानें लंडनमधील भारतीय हायकमिशनरची गांठ घेऊन आपलें म्हणणें त्यांना सांगितलें. माकडांप्रमाणेंच पक्ष्यांच्या निर्यातीलाहि बंदी घालण्यांत यावी, असें सुचविण्यांत आलें आहे. माकडांचा व्यापार मुख्यतः भारत व अमेरिका ह्यांच्यांत चालतो. वैद्यकीय संशोधनासाठी माकडांवर क्रूर प्रयोग करण्यांत येतात असें संघाचें म्हणणें आहे. संघानें गोळा केलेल्या माहितीप्रमाणें चालू वर्षी जानेवारीपासून सप्टेंबरपर्यंत ६९,००० माकडें अमेरिकेला निर्यात करण्यांत आलीं.


दुसरी गुजराती आवृत्ति प्रसिद्ध झाली

# २ वर्षांत ४ आवृत्त्या

# कण आणि क्षण

**( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )**

लेखक : श्री. वा. काळे

१ ली आवृत्ति ( मराठी ) ऑक्टोबर, १९५३
२ री आवृत्ति ( मराठी ) जुलै, १९५४
१ ली आवृत्ति ( गुजराती ) फेब्रुवारी, १९५५
२ री आवृत्ति ( गुजराती ) नोव्हेंबर, १९५५

"महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक, श्री. श्रीपाद वामन काळे, ह्यांनीं प्रस्तुत पुस्तकाच्या द्वारें सुखी जीवनाची किल्लीच जणूं काय प्रत्येकाच्या हातीं दिली आहे. विषयाचें प्रतिपादन कलात्मक आणि सहज पटेल असें आहे."

—दादासाहेब मावळंकर
( गुजराती प्रस्तावनेंत )

"प्रस्तुत पुस्तकावर महाराष्ट्रांतील समर्थ, विद्वान्, विचारक आणि साहित्यकार ह्यांनीं मुक्त हस्तानें व मुक्त कंठानें स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आहे. गुजरात आणि महाराष्ट्र ह्यांतील जीवन, आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न ह्यांत किती साम्य आहे; त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील स्त्रियांचें जीवन हें शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या किती प्रगतिशील आहे, हें प्रस्तुत पुस्तक वाचत असतांना लक्षांत येतें."

—प्रा. शशिन् ओझा
( गुजराती अनुवादक )

"पुस्तक स्त्री-वर्गालाच नव्हे, तर सर्वांनाच उपयोगी व मार्गदर्शक असल्यानें, त्याचा प्रसार करण्यासाठी सस्तु साहित्य कार्यालयानें [ "सस्तु साहित्य म्हणजेच उत्कृष्टांत उत्कृष्ट साहित्य" ] तें प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचेंच आहे."

—प्रा. अनंतराय रावळ
( गुजराती साहित्यिकांतील अग्रगण्य टीकाकार )

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, इरावती कर्वे, वि. द. घाटे, इंदिराबाई देवधर, त्याचप्रमाणें सर्व मराठी व गुजराती वृत्तपत्रें व मासिकें ह्यांचे अत्युत्कृष्ट अभिप्राय. डेक्कन व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीचा पुरस्कार व सरकारची मंजुरी.

मराठी पुस्तक : पृष्ठसंख्या १६८. किंमत २॥ रु.
सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे मिळतें.

### सर विन्स्टन चर्चिल ह्यांचा इषारा

सोव्हिएट रशिआचे पंतप्रधान निकोलाय बुल्गानिन व सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाचे प्रथम चिटणीस मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं आपल्या भारतामधील दौऱ्यांत भारताला तांत्रिक व आर्थिक मदतीचें आश्वासन दिलें आहे. रशिआ भारताला तांत्रिक मदत कितपत देऊं शकेल ह्यासंबंधीं कांहीं वेळां शंका व्यक्त करण्यांत येत असतात. तथापि, ह्या बाबतींत ब्रिटनचे माजी मुख्य प्रधान सर विन्स्टन चर्चिल ह्यांनीं आपल्या देशाला दिलेला इषारा लक्षांत घेण्यासारखा आहे. ब्रिटनच्या हुजूरपक्षीय सभासदांच्या एका मेळाव्यापुढें बोलतांना ते म्हणाले, "रशिआचें सामर्थ्य केवळ राजकारणाच्या क्षेत्रांतच वाढत आहे असें समजणें चूक होईल. इतर बाबतींतहि रशिआची प्रगति होत आहे. मी फक्त एकाच बाबीचा उल्लेख करतों. तांत्रिक शिक्षणाचीच बाब घ्या. हा विषय अतिशय महत्त्वाचा असून ब्रिटनमध्यें त्याकडे द्यावें तितकें लक्ष दिलें जात नाहीं. रशिआला आपण ह्या बाबतींत इतकें पुढें जाऊं दिलें आहे कीं, दोघांमधील अंतराची भीति वाटण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली आहे. गेल्या दहा वर्षांत उच्च श्रेणीच्या यांत्रिक एंजिनिअरिंगच्या शिक्षणांत रशिआनें विलक्षण प्रगति केलेली आहे. रशिआंत तज्ज्ञ एंजिनिअरांची संख्या तर वाढत आहेच; पण त्यांचा दर्जाहि सुधारत चाललेला आहे. त्यामानानें ब्रिटनमधील प्रगति अगदींच बेताबाताची आहे. ब्रिटिश सरकारनें ह्या बाबतींत तावडतोब लक्ष घातलें पाहिजे." रशिअन शास्त्रज्ञ अणुविज्ञानाच्या शाखेंतहि झपाट्यानें प्रगति करीत आहेत ही गोष्ट अमेरिकेच्या अणुशक्ति-कमिशनच्या अध्यक्षांनींहि मान्य केली आहे. भारत व ब्रह्मदेशासारख्या तुलनेनें मागासलेल्या देशांना रशिआकडून मोलाची तांत्रिक मदत मिळूं शकेल, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.

---

### शिलोत्री हक्क रद्द करण्यासंबंधीचा कायदा

राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यानंतर आतां १९५५ चा मुंबई शिलोत्री राईटस् (कुलाबा) ॲबॉलिशन कायदा मुंबई सरकारच्या ता. २ डिसेंबरच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सदरहू कायदा राज्य सरकार जाहीर करील त्या तारखेपासून अंमलांत यावयाचा असून, त्याअन्वयें कुलाबा जिल्ह्यांत सध्यां अस्तित्वांत असलेले शिलोत्री हक्क रद्द करण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

या जिल्ह्यांत कांहीं "शिलोत्रीदार" असून त्यांना पडित खार जमिनींतून लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून कांहीं विशिष्ट प्रमाणांत भात वसूल करण्याचा परंपरागत हक्क आहे. या वसुलीस "शिलोत्री मण" असें म्हणतात. खार जमिनी लागवडीजोग्या करण्यासाठीं पूर्वी जे प्रयत्न करण्यांत आले त्यांतून हे "शिलोत्री" निर्माण झाले. तथापि, या जमिनींतील धरणें, बांधबंदिस्ती, वगैरेंची दुरुस्ती करण्याचें बंधन शिलोत्रीदारांवर नाहीं. अशा रीतीनें शेतकऱ्यांना कांहींहि फायदा मिळत नसतां त्यांच्याकडून "शिलोत्री मण" वसूल करणें, म्हणजे त्यांच्यावर निष्कारण बोजा टाकणें होय.

सदरहू कायद्यान्वयें शेतकऱ्यांनीं शिलोत्रीदारांना त्यांच्या हक्काच्या नुकसानभरपाईदाखल मामलेदार ठरवितील तेवढी किंमत (कॉम्युटेड व्हॅल्यू) द्यावी अशी तरतूद करण्यांत आली आहे.

---

### मुंबई सरकारच्या गॅझेटचे दर

मुंबई सरकारनें, १९५६ सालाकरितां सरकारी गॅझेटच्या निरनिराळ्या वर्गणीचे दर पुढीलप्रमाणें ठरविले आहेतः—भाग १ ला ६० रु.; भाग पहिला एल २५ रु.; भाग पहिला ए १० रु.; पूरक भाग ५ रु.; भाग दुसरा २० रु. भाग तिसरा १५ रु.; भाग ४ था १० रु.; भाग ४ अ १२ रु.; भाग ४ ब १२ रु.; भाग ४ क १२ रु.; भाग ५ वा १० रु.; भाग ६ वा ५ रु.; भाग ८ वा १० रु.; भाग ९ वा १० रु.; भाग १० वा १० रु.; भाग ११ वा १० रु.

जादा गॅझेटच्या निरनिराळ्या भागांकरितां पुढीलप्रमाणें वर्गणीचे दर ठरविण्यांत आले आहेत. भाग १ ला २० रु.; भाग पहिला अ ३ रु.; भाग पहिला एल १० रु.; भाग २ रा ३ रु.; भाग ४ था २० रु.; भाग ४ अ ५ रु.; भाग ४ ब ५ रु.; भाग ४ क ५ रु.; भाग ५ वा २० रु.; भाग ८ वा ५ रु.; भाग ९ वा ५ रु.; भाग १० वा ५ रु.; भाग ११ वा ५ रु.; आणि पूरक भाग २ रु.

---

**विक्रीकराची थकबाकी**— फोर्ट कोचीनमधील काथ्या व काथ्यांच्या वस्तूंचा व्यापार करणाऱ्यांकडून मद्रास सरकारच्या विक्रीकराची रक्कम यावयाची आहे. १९५० पूर्वीच्या काळांतील विक्रीकराची ५ लाख रुपये रक्कम ह्या व्यापाऱ्यांकडे थकली आहे. व्यापाऱ्यांनीं १९५३-५४ व १९५४-५५ ह्या सालाची थकबाकी लवकर देण्याची व्यवस्था केल्यास त्या पूर्वींच्या कराची त्यांना सूट देण्याची तयारी सरकारनें दाखविली आहे. वरील दोन सालांतील विक्रीकराची बाकी सुमारें ९ लाख रुपये आहे.

**तागाच्या गिरणीची यंत्रसामुग्री**— भारतीय सरकारच्या व्यापार व उद्योगखात्यानें पश्चिम बंगालमधील एका कारखान्याला तागाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री बनविण्याचा परवाना दिला आहे. हा कारखाना एका परदेशी कंपनीचें साह्य ह्या कामीं घेणार आहे. नवीन कारखाना निघाल्यानंतर आतांपर्यंत परदेशांतून मागविण्यांत येणारे यंत्राचे कांहीं सुटे भाग देशांतच तयार होऊं लागतील.

**जपान व चीन ह्यांचा व्यापार**—जपानमधील धंदेवाल्यांचें व व्यापाऱ्यांचें एक खाजगी प्रतिनिधि मंडळ चीनच्या दौऱ्यावर गेलें होतें. मंडळानें चीनशीं १.२ कोटी पौंड किंमतीचे सौदे केले आहेत. जपान चीनला खतें, रसायनें, सायकली, कापड व घड्याळें पुरविणार आहे. उलट चीन तांदूळ, मीठ, कोळसा व इतर शेतीचा माल पुरविणार आहे.

तमाम दंतरोगांवर
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला लागणारा पैसा

### सक्तीच्या अभावीं बचत किती हातांशीं येईल?

गुजरात विद्यापीठाच्या समाजशास्त्र शाखेचे चालक डॉ. बी. आर. शेणॉय ह्यांनीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठीं लागणाऱ्या द्रव्याविषयीं आपले विचार प्रकट केले आहेत. नियोजन–समितीला सल्ला देणारें अर्थशास्त्रज्ञांचें जें मंडळ नेमण्यांत आलें आहे त्याचेहि ते सभासद आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, कार्यक्रमाच्या अखेरच्या काळापर्यंत राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७·५ टक्क्यापेक्षा अधिक बचत करतां येईल असें वाटत नाहीं. ह्या गोष्टीचा विचार करूनच कार्यक्रम आंखला गेला पाहिजे. बचतीमध्यें अधिक प्रमाणांत वाढ होण्याची शक्यता नाहीं. कारण, आपण कल्याणकारी राज्याचें ध्येय समोर ठेवलें आहे. शिवाय, समाजवादी पद्धतीची समाजरचना निर्माण करण्याचें धोरण आणि वेतनाचा उत्पादनाशीं जोडण्यांत आलेला संबंध ह्यामुळेंहि अधिक बचत करतां येणें शक्य होणार नाहीं. सार्वजनिक मालकीच्या विभागांत गुंतवावयाच्या भांडवलामुळें चलनवृद्धि होण्याचा संभव असतो. कार्यक्रमांत, ह्या विभागांत भांडवलाची जी गुंतवणूक करण्यांत येणार आहे ती दरवर्षी ३०० कोटी रुपयांची परदेशीय मदत मिळाली तरच शक्य होईल. नाहींतर चलनवाढीचा धोका उत्पन्न होईल. दुसऱ्या कार्यक्रमांत उत्पादनाचीं जी उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं आहेत तीं गांठण्यासाठीं एकूण ५,६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागेल. त्यापैकीं ३,४०० कोटी रुपये सार्वजनिक मालकीच्या विभागासाठीं लागतील आणि २,२०० कोटी रुपये खाजगी मालकीच्या विभागासाठीं लागतील. अर्थशास्त्रीय दृष्ट्या विचार करतां किती रकम गुंतवावयाची तें आधीं ठरविणें व नंतर ती उभारण्यासाठीं प्रयत्न करणें ही पद्धत योग्य नाहीं. राष्ट्रीय अंदाजपत्रक तयार करतांना खर्चाचा आंकडा प्रथम ठरविणें व नंतर पैसा गोळा करण्याची व्यवस्था करणें ही गोष्ट चालू शकेल. पण आर्थिक नियोजन करतांना ही पद्धत योग्य ठरणार नाहीं.

कम्युनिस्ट पद्धतीच्या नियोजनांत उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठीं गुंतविण्यांत येणारें भांडवल मर्यादित करून बचतीच्या प्रमाणांत फरक करतां येणें कांहीं मर्यादेपर्यंत शक्य होतें. ही मर्यादा पाळून कम्युनिस्ट राजवटींत प्रथम खर्चाचा आंकडा निश्चित करतां येऊन त्याच्या अनुरोधानें लोकांचें जीवनमान खालीं आणतां येतें. पण लोकशाही समाजांत बचत करणें अगर न करणें ही गोष्ट व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असतें. त्यामुळें बचतीच्या प्रमाणांत वाटेल तसा फरक करतां येत नाहीं. म्हणून, हाताशीं येऊं शकणाऱ्या निधीचा अंदाज प्रथम बांधणें जरूर असतें. कार्यक्रमाला लागणारा पैसा चालू काळांतील बचत, पूर्वी करण्यांत आलेली बचत, आणि परकीय मदत ह्या तीन मार्गांनीं मिळूं शकतो. सार्वजनिक अगर खाजगी मालकीच्या विभागांत गुंतविण्यांत येणारा पैसा ह्याच साठ्यांतून घ्यावा लागेल. उत्पन्नांतील शिल्लक, कर्जें, अल्प–बचत, सरकारच्या मालकीच्या कारखान्यांत झालेला फायदा, इत्यादि बाबी कांहं नवा पैसा निर्माण करूं शकत नाहींत. तळ्यांतील पाणी घेण्याचे ते निरनिराळे मार्ग आहेत. अखेर बचत केल्याशिवाय गुंतवणुकीसाठीं पैसा मिळूं शकणार नाहीं हेंच सत्य आहे. म्हणून बचतीच्या प्रमाणापलीकडे अधिक गुंतवणूक शक्य होणार नाहीं. ह्या नियमाला अपवाद म्हणजे फक्त श्रमदानाची पद्धतच होऊं शकेल. भूदान व संपत्तिदान ह्यांच्यामुळें अस्तित्वांत असलेल्या संपत्तीची वांटणी होऊं शकेल. पण उत्पादक गुंतवणूक त्यांच्यामुळें होणार नाहीं. योजनेच्या खर्डांत राष्ट्रीय उत्पन्न व बचत ह्यांच्याविषयीं करण्यांत आलेले अंदाज वाजवीपेक्षा अधिक आशेवर आधारलेले आहेत.

---

**पश्चिम जर्मनीची भारताला देणगी**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत पश्चिम जर्मनीनें आपलें दालन उघडलें आहे. जर्मनीच्या दालनांत कांचेचा मानवी पुतळा व ग्रहगोल अशा दोन आश्चर्यकारक वस्तू आहेत. कांचेचा पुतळा ६२ पौंड वजनाचा असून ५ फूट, ९ इंच उंच आहे. पुतळ्यांत मानवी शरीराचे निरनिराळे अवयव लक्षांत भरण्यासारख्या पद्धतीनें दाखविण्यांत आले आहेत. बटन दाबतांच ह्या अवयवांचे व्यापार सांगणारा एक रेकॉर्डहि चालू होतो. हा पुतळा व ग्रहगोल प्रदर्शन संपल्यावर भारताला देणगी म्हणून मिळणार आहेत.

**डच शास्त्रज्ञाचा शोध**—दक्षिण हॉलंडमधील एका रसायन विषयाच्या शास्त्रज्ञानें नव्या प्रकारच्या रंगाचा शोध लावला आहे. हा रंग पोलादाचे पूल, बोटी, विमानें, इत्यादींना लावला असतां धातू गंजण्याची क्रिया फारच कमी होते. रंगाचे फक्त दोनच हात दिले तरी चालतात; समुद्राचें पाणी व गंज ह्यांचा परिणाम रंगाच्या योगानें फारच कमी होतो. बोटींचे तुकडे एकमेकांना जोडतांना उपयोग कराव्या लागणाऱ्या उष्णतेनेंहि तो उडत नाहीं.

---


## दि बँक ऑफ कराड लि., कराड.

स्थापना–१२–३–१९४६

हेड ऑफिस, कराड. शाखा–भवानी पेठ, सातारा.

| | |
|---|---|
| शेअर वसूल भांडवल | रु. २,१८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ६२,००० |
| खेळतें भांडवल | रु. २३,५०,००० |

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —

चेअरमन : श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे.

व्हाइस–चेअरमन : श्री. ना. बा. बुधकर.

श्री. रा. वि. वेलणकर, श्री. शं. म. ओगले, मेजर सरदार वी. एन्. पाटणकर, श्री. वि. द. शिराळकर, डॉ. व्ही. जी. देशपांडे, श्री. रा. अ. अराणके, श्री. म. रा. देशपांडे.

**मुदत–ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातात.**

| | | |
|---|---|---|
| मुदत वर्ष एक | ... | ३¼% |
| मुदत वर्षें दोन | ... | ३½% |
| मुदत वर्षें तीन | ... | ४% |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कराड, ता. ११–१०–५५

म. वि. खंडकर
मॅनेजर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

पोस्ट बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३

पुणें जिल्ह्यांतील सर्व जनतेच्या विश्वासास पात्र झालेली ही सहकारी मध्यवर्ती बँक असून गेलीं आठ वर्षे आपले भागीदारांस ६ टक्के डिव्हिडंड देत आहे. भागविक्री चालू आहे. बँकेचे मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची सोय आहे. पुणें शहरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय प्रथमतः आपल्या बँकेनेंच सुरू केली. जिल्ह्यांत सर्व तालुक्याचे ठिकाणीं बँकेच्या शाखा असून त्यांचे मार्फत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. बँकेची सर्वांगीण प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| (१) दिनांक ३०-६-५५ अखेर भागांचें वसूल भांडवल | रु. | ८,३१,००० |
| (२) गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७,९६,००० |
| (३) एकूण ठेवी | रु. | १,६७,००,०००चे वर |
| (४) एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९१,१७,०००चे वर |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—यथायत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलिपत भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांवे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा. बेंडे, श्री. झा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.